# चार्वाक दर्शनातील आस्तिकता

**गोरोबा तुकाराम खुरपे**
संशोधक विद्यार्थी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड (महाराष्ट्र)
Email : gtkhurpe@gmail.com

**डॉ. संजय हणमंतराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक
देगलूर महाविद्यालय, देगलूर
जि. नांदेड (महाराष्ट्र)
Email : sanpatdegloor@gmail.com

**प्रस्तावना :**

चार्वाक तत्त्वज्ञान हे सर्वनिर्मूलवादी, पण जीवनातील प्रत्यक्ष अनुभवाशी नाते सांगणारे आहे. चार्वाक ही एक 'चार्वाक दर्शन' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नास्तिक मताची प्रवर्तक असलेली, कोणी चार्वाक नावाची व्यक्ती असावी, असा एक समज आहे. ही विचारपरंपरा वेदांइतकीच प्राचीन आहे. चार्वाक ही व्यक्ती काल्पनिक होती, एकच होती का त्या विशिष्ट जीवनवादी तत्त्वज्ञानाच्या पुरस्कर्त्यांकरिता वापरलेली उपाधी होती, या बाबत तज्ज्ञांत वेगवेगळी मते आहेत. असे असले तरी हे चार्वाक जडवादी व भौतिकवादी अशा लोकायत नावाच्या अवैदिक तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते या बाबत दुमत नाही. तत्कालीन इतर धर्मीय तत्त्वचिंतकांनी त्यांच्या या अनीश्वरवादी विरोधकांवर उपभोगवादी असल्याचा शिक्का मारून त्यांना टीकेचे लक्ष्य बनवले. महाभारतात चार्वाक नावाच्या कौरवांच्या बाजूने असलेल्या एका व्यक्तीचा उल्लेख आढळतो, पण तिथे लोकायत तत्त्वज्ञानाची कोणतीही चर्चा किंवा त्या व्यक्तिरेखेचा कोणत्याही विशिष्ट तत्त्वज्ञानाशी संबध असल्याची नोंद आढळून येत नाही. काही काळाने चार्वाकाचे दोन प्रकारचे अनुयायी बनले. त्यातील एका बाजूचे अनुयायी आस्तिक विचाराचे समर्थन करत होते तर दुसऱ्या बाजूचे नास्तिक !

प्राचीन भारतीय दर्शनामध्ये मानवी जीवनावर प्रेम, मानवी जीवन सुखमय होण्यासाठीचे प्रयत्न, कर्मकांड विरोधी विचार, भ्रामक कल्पनांना फाटा, स्त्रीविषयक सन्मानपूर्वक समान दृष्टिकोन असे जीवनावश्यक विचार चार्वाकांशिवाय कदाचित कोणी मांडले नसावेतच ! चार्वाकांच्या या तत्त्वविचारातून स्वभाविकच अस्तिकता दिसून येते म्हणूनच तर त्यांना आ. ह. साळुंखे यांनी '*आस्तिकशिरोमणी*' ही उपाधी दिलेली आहे. चार्वाकांनी अज्ञानाच्या व शोषणाच्या व्यवस्थेला नाकारून रचनात्मक विधायक बाजू मांडून एक नवा समाज निर्माण करण्याचा मंत्र दिला. चार्वाक दर्शन ऐहिक पार्थिव व स्व –कष्टार्जित अशा वास्तव आनंदाची वाट धरून कल्पनेतल्या पारलौकिक आणि अध्यात्मिक आनंदाला दूर ठेवते. स्वत:ला आस्तिक म्हणून घेणारे वैदिकांची दांभिकता, आर्थिक हितसंबंध आणि खोटेपणा चार्वकांनी उघड केला. चार्वाकांनी तार्किक चिकित्सा आणि विविध कसोट्यावर तत्कालीन वैदिक धर्मपंतांची कसून चिकित्सा केली. '*प्रत्यक्ष प्रमाणम्*' या कसोटीवर तर त्यांनी संपूर्ण कर्मकांडच पोकळ करून सोडले आणि मानवी जीवनाला तसेच मानवी सुखाला केंद्रस्थानी मानले.लोकायत म्हणजेच चार्वाक दर्शन. लोकायत, जैन आणि बौद्ध ही दर्शने नास्तिक होत. निरीश्वरवादी तर ती होतीच. त्यांना अवैदिक दर्शने असेही म्हटले जाते. भारतीय

तत्त्वज्ञानाचा इतिहास म्हणजे आस्तिक आणि नास्तिक दर्शनांच्या संघर्षाचा, म्हणजे वादप्रतिवादाचा इतिहास होय. अर्थात, आस्तिक किंवा नास्तिक दर्शनांमध्ये आपसांतील अंतर्गत वाद नव्हते, असे मात्र नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. चार्वाक दर्शनातील आस्तिकतेचा अभ्यास करणे
२. चार्वाक दर्शनातील तत्त्वविचार आस्तिकतेचा शोध करणे
३. चार्वाक दर्शनातील आस्तिकतेबाबत चिंतन करणे

**संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधन लेखासाठी नियतकालिके, वर्तमानपत्रातील तसेच संकेतस्थळावरील लेख आणि विविध तज्ञांची मते विचारात घेऊन चिंतन करून चार्वाक तत्त्वविचार आणि सद्यः स्थिती यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे.

**चार्वाक दर्शनातील आस्तिकतेचा शोध :**

१. भारतीय संस्कृतीतील तत्त्वज्ञानामध्ये आस्तिक आणि नास्तिक अशा दोन विभागात वर्गीकरण करण्यात आलेले आहे. "चार्वाक दर्शन" हे नास्तिक तत्त्वज्ञानात सर्वप्रथम येणारे नाव आहे. चार्वाक दर्शनानंतर "बौद्ध व जैन तत्वज्ञान" येतात. भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील एक उमदे आणि विवेकनिष्ठ परंतु उपेक्षित आणि तिरस्कृत असे चार्वाक दर्शन असून " लोकायत दर्शन" असेही म्हणतात. लोकायत याचा अर्थ म्हणजे सर्वसामान्य लोकांमध्ये पसरलेले दर्शन असा होतो.

२. जी भारतीय दर्शनशास्त्र वेदांना प्रमाण मानतात त्यांना आस्तिक भारतीय दर्शन मानणारी विचारसरणी म्हणतात. सांख्य दर्शन, योग दर्शन, न्याय दर्शन, वैशेषिक दर्शन, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा ही सहा आस्तिक दर्शनें आहेत. आस्तिक म्हणजे ईश्वराला मानणारी हा अर्थ चुकीच्या अर्थाने रूढ झाला आहे. आस्तिकता किंवा नास्तिकता ही वेदांच्या मानणे अथवा न मानणे यावर ठरते.

३. '*नास्तिक*' म्हणजे ईश्वराचे अस्तित्व मानत नाही तो नास्तिक किंवा जगाची निर्मिती ईश्वराने केलेली नाही असे मानणारा निरीश्वरवादी अशी आजची धारणा आहे. पण भारतीय तत्वज्ञानात आस्तिक दर्शनातील काहींनी ईश्वराचे अस्तित्व नाकारून देखील त्यांना आस्तिक म्हटले आहे पण चार्वाक, बौद्ध आणि जैन यांना मात्र नास्तिक म्हटले जाते कारण या तिन्ही दर्शनाने ईश्वर आणि वेद नाकारले. ईश्वराच्या अस्तित्वापेक्षा वेदाचे अस्तित्व अमान्य करणे म्हणजे नास्तिक ! चार्वाक दर्शनात वेदाची चिकित्सा केली आणि वेद विरोधी परखड मतांची मांडणी केली म्हणून चार्वाक दर्शनाला नास्तिक दर्शन संबोधले जाते.

४. आस्तिक एक युक्तिवाद देतात की या भौतिक जगात आणि सर्व सृष्टीमध्ये सर्व गोष्टींमध्ये एक नियम आणि उद्देश आहे. हे या वस्तुस्थितीचे द्योतक आहे की एक बुद्धिमान देव हे चालवत आहे. नास्तिकता कल्पनेचे अशा प्रकारे खंडन करते की, जगात अशा अनेक घटना घडतात ज्यांचा कोणताही हेतू नसतो किंवा अतिवृष्टी, दुष्काळ, दुष्काळ, पूर, आग, अकाली मृत्यू, म्हातारपण, रोग आणि अनेक हिंसक प्राणी. जगात जितके नियम आणि एकता

दिसून येते, तितकीच अनियमितता आणि विरोधाभासही दिसून येतात. चार्वाक दर्शनात प्रत्यक्ष प्रमाणाला महत्त्व आहे.

५. चार्वाक दर्शनात उच्च मानवी मूल्यांच्या स्विकार केलेला आहे यातून चार्वाक दर्शनाची आस्तिकता दिसून येते. चार्वकांनी सर्वसामान्य माणसाच्या सुखाचा - सुखमय जीवन जगण्याचा विचार मांडला यात सुख हे साध्य आणि चार्वाक दर्शन हे साधन असल्याचे दिसून येते त्यामुळे चार्वाक दर्शन हे मानवी जीवनासाठी सुखकारक शास्त्र ठरते. मानवी जीवन जगात असताना चार्वाक दर्शनात मूल्यांना महत्त्व दिल्याचे आढळते. मूल्यहिन मानव हा समाजासाठी घातक असतो, त्याच्या हातून विध्वंसक कृत्य घडतात. चार्वाक तत्त्वविचार हे मानवी जीवनाला सुखकारक होण्यासाठी उपयुक्त ठरतात यात कोणाचेही दुमत असता कामा नये.

६. चार्वाक दर्शनात तत्कालीन धर्ममतांची परखड चिकित्सा केली आणि वैदिकांची दांभिकता, आर्थिक हितसंबंध, खोटेपणा, अंधश्रधा यासारख्या अनेक बाबी उघड्या पडल्या त्यामुळे वैदिक अनुयायांनी चार्वाक दर्शनाचा कमालीचा तिरस्कार केला परंतू चार्वाकांनी जी मूल्ये मानवी हिताची आहेत त्यांच्या विषयी तडजोड केली नाही. सर्वसामान्य मानवी जीवन जगताना सर्वसामान्यांची फसवणूक होऊ नये तर समाजातील प्रत्येक घटकास एक चांगले - सुखी जीवन जगता आले पाहिजे हा सर्वसामान्यांचा मानस असतो - विचार असतो मात्र प्राचीन काळी वैदिकांचे अनुयायी आपले हितसंबंध - स्वार्थ जपण्यासाठी खोट्या अंधश्रद्धा पसरवून जन सामान्यांची पिळवणूक करत असत आणि नेमके हेच चार्वाकांना मूळीच मान्य नव्हते.

७. मानवी जीवन जगात असताना प्रत्येकाला ते आनंदाने उपभोगता यावे यासाठी चार्वाक दर्शनाची भूमिका ही आग्रहाची होती. सुख प्राप्तीसाठी केवळ कर्मकांडाच्या आहारी जाऊन नको त्या गोष्टी करणे यात कसला आला आहे विवेक ! सुख प्राप्तीसाठी मानवाने कष्ट करावे - अर्थ प्राप्ती करावी आणि सुखाचा उपभोग घ्यावा हीच खरी आस्तिकता होय असे चार्वाकांनी आपल्या दर्शनात बजावले आहे. कोणालातरी लुबाडून अर्थ प्राप्ती करावी आणि सुखाचा उपभोग घ्यावी हे चार्वाक दर्शनात सांगितलेले नाही तर मानवाने विवेकाने काम घ्यावे, नीतीने वागावे, कर्मकांडाच्या आहारी न जाता समोरील बाबी तपासून, निरखून-पारखून घ्याव्यात असा युक्तिवाद केल्याचे दिसून येते.

८. ईश्वराचे अस्तित्व, वेदाचे प्रामाण्य, परलोक, पाप-पुण्य, जीवात्मा आणि विशिष्ट सिद्धांत या व इतर बाबी चार्वाकांनी विशिष्ट अर्थांनी नाकारल्या हे सत्य आहे त्यामुळे पारंपारिक रूढ अर्थांनी ते 'नास्तिक' ठरतात परंतु चार्वाकांच्या नास्तिकतेचे व इतरांच्या कथित आस्तिकतेचे स्वरूप सूक्ष्म रितीने समजून घेतले तर चार्वाक दर्शनातील आस्तिकता लक्षात येते.

९. प्रत्येक दार्शनिक एकाच वेळी कशाचे तरी अस्तित्त्व मान्य करीत असतो आणि कशाचे तरी अस्तित्त्व मान्य करीत नसतो, यावरून अस्तित्त्व मान्य करणारा जर आस्तिक असेल तर या न्यायाने चार्वाक दर्शन हे जगाचे अस्तित्त्व मान्य करते म्हणून आस्तिक आणि ब्राह्मणाचे अस्तित्त्व नाकारते म्हणून ते नास्तिक ठरते तसेच वैदिकांच्या गोटातील पूर्वमीमांसा, सांख्य या दर्शनांनी इश्वराचे अस्तित्व नाकारूनही त्यांचा समावेश आस्तिक दर्शनामध्ये केलेला आहे. याचा अर्थ वास्तवतः असा निगतो की, जे दर्शन वैदिक प्रामाण्य मानते ते आस्तिक आणि जे दर्शन वैदिक प्रामाण्य मनात नाही ते नास्तिक ! चार्वाक दर्शनाचे

अनुयायी इहवादी होते, तसेच सुखवादीही होते परंतु त्यांनी सुखोपभोगाच्या प्राप्तीसाठी चोरी, इतरांचे शोषण, फसवणूक इत्यादी मार्ग सांगितले नाहीत किंवा अशा मार्गाचा धर्माच्या नावाखाली छुपा पुरस्कारही केलेला नाही. ज्या मार्गाच्या द्वारे प्रत्यक्षात उपजीविकेचे उत्पादन होत होते आणि जे मार्ग अत्यंत न्याय आणि कायदेशीर होते, अशा मार्गांचाच चार्वाक दर्शनात पुरस्कार केलेला आहे.

१०. ज्ञान नम्रपणा तर अज्ञान अहंकार धारण करते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे '*धर्मग्रंथ*' ! *धर्मग्रंथ* अंतिम सत्य सांगतात, त्यात काही चूक किंवा अपुरेपणा असेल असे त्यांच्या कर्त्याधर्त्यांना वाटत नाही. आपले सांगणे हेच ईश्वराचे सांगणे असे त्यांना ठामपणे वाटत असते त्यामुळे पुरोहित, पुजारी, धर्मगुरू सारखी मंडळी नेहमीच संपूर्ण अंतिम सत्याची भाषा बेधडक सांगत असतात मात्र शास्त्रज्ञ हे जेवढे प्रत्यक्षात सत्य तेवढेच सांगत असल्याने ते नम्रपणा धारण करतात. चार्वाक दर्शनाच्या तत्त्वविचारातही अशाच प्रकारचा वैज्ञानिक दृष्टिकोन दिसून येतो. धर्मग्रंथ जशी अंतिम सत्याची थेट भाषा करतात तशी भाषा वैज्ञानिक करीत नाहीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कृष्ण विव्रवरील प्रयोग जरी फसला असला तरीही फ्रांस, इटली व स्वित्सर्लंड मध्ये जमिनीच्या खाली सव्वीस मैल लांबीची गोलाकार वेधशाळा बांधून तेथील हजारो वैज्ञानिकांनी त्यांचे संशोधन चालू ठेवले आहे. विज्ञानाच्या मते, विश्वाच्या उत्पत्तीचे कारण आणि स्थिती अजूनही संशोधन क्षेत्रात आहे तर मग चार्वाक दर्शनातील तत्त्वविचाराला अर्थात प्रत्यक्ष प्रमाणाला महत्त्व दिले तर बिगाडले कुठे ?

११. वैदिकांना विधवांनी सती जाणे हे *'चांगले'* वाटत होते परंतु ही बाब भारतासारख्या धर्मनिरपेक्ष आणि स्त्री - पुरुष समानता राबविणाऱ्या देशात योग्य नाही. उपरोक्त बाबीचे समर्थन न करता डॉ. राधाकृष्णन यांनी विधवा सती जाणे हे चांगले यात चांगल्याला विरोध करणे हे मानवी मूल्य नक्कीच हे नव्हते असे मत मांडले. डेल रिप यांनी चार्वाक विचारांबाबत आपले परखड मत खालील प्रमाणे व्यक्त केले आहे-

> "It may be said from the available material that Charvaka holds truth, integrity, consistency and freedom of thought in the highest esteem. This is aside from the question of whether we regard these things as noble or ignoble"

सती जाणे हे चुकीचे, यामुळे स्त्री -पुरुष समानतेचा ऱ्हास होईल. चार्वाक सिद्धांत योग्य आहे - सत्य आहे आणि ते आजच्या परिस्थितीत ग्राह्य धरले तरच धर्मनिरपेक्षता देशात नांदेल. सद्य:स्थितीत चार्वाकाचे सिद्धांत सत्य, ग्राह्य व हितकारक आहेत आणि वैदिकांचे सिद्धांत याच्या उलट आहेत. चार्वाकांच्या मते स्त्रियांना आदराने वागवावे कारण ते स्त्री -पुरुष समानतेचा पुरस्कार करतात. कामवासना ही स्त्री आणि पुरुष यांना समान असल्यामुळे त्या वासनापूर्तीचे नियम आणि निर्बंध दोघांनाही समान असले पाहिजेत असे त्यांचे म्हणणे आहे. प्रजननामध्ये स्त्री आणि पुरुष यांचा समान सहभाग असताना वर्णसंस्कारांमध्ये एकट्या स्त्रीला जबाबदार ठरविणे योग्य नाही. अनाचाराला स्त्री इतकाच पुरुषही जबाबदार असतो त्यामुळे स्त्रियांची कलंकित वगैरे अपशब्दाने निंदा करणे योग्य नाही. चार्वाकांनी स्त्रीची एक व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य राखण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते स्त्रीला दारू सारखे समजणे किंवा तिच्याकडे कामवासनेची पूर्ती करणारे साधन मानणे आणि तिला तसे वागवणे अयोग्य आहे. स्त्री ही निर्जीव वस्तू नाही त्यामुळे पुरुषांनी तिला आपली मालमत्ता आहे असे समजणे योग्य नाही.

*मानवी उच्च मूल्ये नाकारणारे ते नास्तिक आणि स्वीकारणारे ते आस्तिक या अर्थाने संज्ञा वापरल्या तर वैदिक नास्तिक आणि चार्वाक दर्शनास आस्तिक मानणे अपरिहार्य ठरते.*

**चार्वाक दर्शनातील आस्तिकतेचे चिंतन :**

१. सर्व दर्शन संग्रहांमध्ये चार्वाक दर्शनावरचा उल्लेख पुढीलप्रमाणे आढळतो -

सर्व दर्शनातील सिद्धांत खोडून काढणे अवघड आहे कारण बहुदा सर्व लोकच सर्वात महत्त्वाचे अनुसरण करीत असलेलेच आढळतात म्हणून बहुसंख्य लोकांच्या हितासाठी चार्वाक मतांचा आश्रय घेणे हे आनंददायक होय.

विषयाच्या संपर्कातून निर्माण होणारे सुख यात मिसळलेले असल्यामुळे लोकांनी त्याचा त्याग करावा हा मूर्खपणाचा विचार झाला. आपल्या हिताची इच्छा करणारा कोणता मनुष्य पांढरे शुभ्र उत्तम तांदळांनी भरलेल्या साळी टरफलांनी झाकले आहेत म्हणून ते टाकून देऊ पाहिल बरे? शहाण्या माणसाने या जगामध्ये नेहमी शेती, गोरक्षण, व्यापार, दंडनीती इत्यादी प्रत्यक्षसिद्ध मार्गानेच सुखोपभोगाचा अनुभव घ्यावा याहून मोठी आस्तिकता कोणती आहे?

चार्वाकांचे विचार वास्तववादी आणि हितकारक असून त्यांनी स्वानुभवनिष्ठा व प्रयोगशीलता यांना महत्त्व दिले आणि आज विज्ञानाचा प्रवास त्याच दिशेने चालू आहे. चार्वाक दर्शनाने धर्मावर हल्ला चढविलाला आणि आज भारतीय घटना धर्मनिरपेक्षतेचा अंगीकार करताना दिसते. आज धर्मा-धर्मात द्वेष आणि हिंसाचार यांना धर्मच प्रोत्साहन देत आहे. हे पाहून त्याला आवर घालण्याची गरज सर्व समंजस्य लोकांना वाटू लागली आहे. चार्वाकांना स्त्री - पुरुष समानतेचा, प्रयत्नवादाचा व भौतिक प्रगतीचा पुरस्कार केला. आज ही सगळी मूल्ये स्वीकारली जात आहेत तात्पर्य ज्या मूल्यांचा पुरस्कार केल्याबद्दल एकेकाळी चार्वाकांना धर्मविरोधी, पापी, समाजविरोधी ठरविण्यात आले होते तीच मूल्ये आज मानवाच्या सर्वाधिक हिताची व कल्याणाची आहेत असे मानले जात आहे.

२. सर्व मानवात ईश्वर आहे तर मग स्त्रियांवर अन्याय का केला जातो. चार्वाकाच्या कालखंडातील स्त्री वर्गावर ब्राह्मण वर्ग, पुरोहित, भिक्षुके राजे महाराजे यांच्याकडून होणाऱ्या अन्याय अत्याचारावर दर्शनात टीका करण्यात आली आहे. स्त्री ही जड वस्तू नाही तर स्त्री ही विधायक वृतीची असते. स्त्री सुसंवाद, मेळ, सामंजस्य आणि प्रेम यांचा समन्वय साधणारी असते. तिला भोग वस्तू समजणे हे अत्यंत चुकीचे आहे. स्त्रियांना कमी लेखून दुय्यम वागणूक देणे हे मानव जातीला काळीमा फासणारे आहे. चार्वाक दर्शनात स्त्रियांविषयीची दृष्टी व अभिवृत्ति सुधारणावादी आहे यामध्ये स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी आदर व सन्मानाची आहे. स्त्री - पुरुष समानतेचा चार्वाक पुरस्कार करतात.

३. भ्रामक कल्पनांची दलदल मानवी मनामध्ये निर्माण करून त्याला धर्माच्या चक्रात व्यग्र करण्याचे नीती वैदिकांची मुख्य विचारशैली होती. आधुनिकता ही काळावर नाही तर विचार सूत्रावर निश्चित होत असल्याने आधुनिकतेच्या दृष्टीने वैदिकांनी निर्माण केलेल्या सर्वच बाबींची चिकित्सा करणे आवश्यक होते. वैद्यकांचे विचार हे नकारात्मक स्वरूपाचे होते त्यामुळे त्यांनी विषमता, अन्याय, वर्णव्यवस्था, जाती व्यवस्था, लिंगभेद, पारलौकिक जगाबद्दल भ्रामक कल्पना पूनर्जन्माची कल्पित कहानी अशा विविध बाबी मांडून त्यांनी गुलामगिरीची व्यवस्था विकसित केली होती. चार्वाक दर्शनात अशा व्यवस्थेला विद्रोहाच्या सकारात्मक शैलीने उद्ध्वस्त करत आपल्या तत्त्वविचारत मानवतावादी व्यवस्थेचे

समर्थन करून तशी समाजव्यवस्था साकारण्याचा प्रयत्न चार्वाक दर्शनाने केला.

४. कालानुसार मानवाने आपल्या दृष्टिकोनात बदल केला पाहिजे तरच प्रगती होईल. चार्वाक विचार अथवा दर्शन हा एक जगाकडे पाण्याचा आधुनिक दृष्टिकोन आहे. मानवी जीवन योग्य पद्धतीने जगण्याची आणि त्यात उन्नती करण्याची ती एक विज्ञानाधारित रीत आहे. चार्वाक दर्शनानुसार जीवन एक वस्तुस्थिती आहे. चार्वाक दर्शनात खोटी प्रतिष्ठा – दुटप्पीपणा अशा बाबींना महत्त्व न देता जीवनातील प्रत्येक समस्या प्रामाणिकपणे आणि भौतिकवादी दृष्टिकोनातून सोडवण्यावर भर देण्यात आला. मानवाने आपण उत्तम जीवन जगण्यासाठी जन्माला आलो आहोत हे भान ठेवून कार्य केले पाहिजे मानवाला एकदाच जन्म आहे आणि तो एकदा नष्ट झाला की पुन्हा जीवन नाही, मृत्यू अटळ हा आहे. मिळालेले जीवन आनंदाने जगणे हाच प्रत्येक मानवाने आपला जीवन उद्देश ठेवला पाहिजे असे चार्वाक दर्शन सांगते.

५. '*कणकण मे भगवान है*' असे असेल तर मग एक माणूस दुसऱ्या मानवाला दु:ख का देते? त्रास का करते? यात कसली आली आस्तिकता? समाजातील प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो मग ठराविक लोक इतर घटकांचे शोषण करतात हे योग्य आहे का? असा सवाल चार्वाक दर्शन उपस्थित करते. धर्माची शिकवणी प्रेमाची - माणुसकीची असेल तर धर्माच्या नावावर पशुहत्या करून त्याचे सेवन करणे योग्य आहे का? जन्मदात्या आई - वडिलांना जिवंतपणे सुख द्यायचे नाही, त्यांची सतत अवहेलना करायची आणि ते मेल्यानंतर किर्तन ठेवायचे - श्राद्ध घालायचा यात कसला आला आहे शहाणपणा ! प्रत्येकाला सुखी जीवन जगण्याचा समान अधिकार असताना इतरांचे सुख हिराहून घेणे यात कसली माणुसकी ? केवळ दया, शांती, माणुसकी अशा बाबी सांगण्याच्याच बाबी असतात का ?

६. चार्वाक दर्शनात पारलोकिक संकल्पना नाकारताना केवळ नकारात्मक वृत्ती स्विकारलेली नव्हती कारण चार्वाक दर्शनात नैरात्म्यवाद स्विकारताना देहात्मवाद आणि भौतिकवाद मांडला, पूर्वजन्म नाकारताना वर्तमान जीवनावर प्रेम करण्यास सांगितले, कर्मसिद्धांत नाकारताना प्रयत्नवादाचा पुरस्कार केला, परलोक नाकारताना इहलोकाचा गौरव केला, मोक्ष नाकारताना स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, ईश्वर नाकारताना स्वभाववाद सांगितला अर्थात चार्वाक दर्शनाने इहलोकीच्या सुखाचा स्विकार करण्याची प्रेरणा दिली. आ. ह. साळुंके यांच्या मते, इतरांचे शोषण करून स्वैराचाराने आनंद मिळवावा असे चार्वाक दर्शनात सांगितलेले नसून समाज व्यवस्थेत निकोप नियमांचे पालन करून आनंदाचा उपभोग घेण्यासाठी भरपूर कष्ट करावेत आणि स्वत:च्या कष्टातून नि:संकोच आनंद घ्यावा.चार्वाक दर्शनातील रचनात्मक- विधायक बाजू अधिक प्रबळ आहे. चार्वाकांना एक नवा माणूस निर्माण करावयाचा आहे - एक नवा समाज निर्माण करावयाचा आहे, नवनिर्मितीचा असा ध्यास घेतलेल्या आणि त्या निर्मितीला योग्य मार्गही अनुचित आहे म्हणून मानवी जीवनावर अपार आणि तितकेच निकोप प्रेम करणाऱ्या चार्वाक दर्शनाला आस्तिक म्हणणे हेच योग्य होईल !

**संदर्भ :**

१. कुमठेकर, उदय *'चार्वाकमंथन'*, पुणे, परामर्श प्रकाशन
२. साळुंके, आ. ह. 'आस्तिकशिरोमणी चार्वाक', सातारा, लोकायत प्रकाशन
३. गाडगीळ,स. रा., लोकायत, मुंबई, लोकवाङ्मय गृह १९७४

VOL- X ISSUE- XII DECEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

४. कुमठेकर, उदय, वेध चार्वाकाचा,नांदेड, अभय प्रकाशन
५. गोखले, प्रदिप, चार्वाकवाद आणि अद्वैतवाद, पुणे, महाराष्ट्र टिळक विद्यापीठ
६. माधवाचार्य, सर्वदर्शनसंग्रह – चार्वाक मत, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ १९८५
७. गोखले, प्रदीप, *तत्त्वचिंतक चार्वाक*, पुणे, मनोविकास प्रकाशन २०१३
८. चार्वाक (२०१३, एप्रिल६)विकिपीडिया,एक मुक्त ज्ञानकोश. Retrieved ०९:२५, मार्च ११, २०१४
९. कुंभार, नागोराव, विचारशलाका (संपादकिय) जोड अंक १४६ -१४९, वर्ष ३८ वे, एप्रिल २०२३ ते मार्च २०२४
१०. Chattopadhaya, Deviprasad, ' Lokayata : A Study in Ancient Materialism, Delhi 19569
११. https://iep.utm.edu/indmat/
१२. https://www.evivek.com/Encyc//22/3/2021 charvaka-philosophy-in-marathi.html
१३. https://mr.wikipedia.org/s/803